इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता मूल्यमापनात कृतिपत्रिकेची उपयुक्तता – एक अभ्यास.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या पी.एच.डी.

पदवीसाठी सादर.

संशोधक

झांगडे अर्चना विठ्ठलराव

एम.ए. (मराठी) एम.ए.(राज्यशास्त्र)

एम एड नेट (शिक्षणशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. गिरगावकर बालाजी जी.

एम.एस.सी. (Phy.Math.) M.Ed. Phd.

संशोधक केंद्र

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वर्ष

(2019)

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशील	पान क्र.
1	प्रस्तावना	1
2	संशोधनाची गरज	2
3	संशोधनाचे महत्व	3
4	समस्या विधान	4
5	व्याख्या	5
6	संशोधनाची उद्दिष्टे	5
7	गृहितके	5
८	संशोधनाची व्याप्ती	6
9	संशोधनाची मर्यादा	7
10	संशोधन पध्दती	7
11	जन संख्या, न्यादर्श	7
12	माहिती संकलनाची साधने	8
13	सांख्यिकी परिमाणे	8
14	संशोधन कार्यवाहीचे टप्पे	9
15	वेळापत्रक	10
16	अंदाजपत्रक	11
17	संदर्भग्रंथ सूची	12

1. प्रस्तावना :-

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हा शिक्षणातून अभिप्रेत असतो. त्यानुसार अभ्यासक्रम योजिलेला असतो. विद्यार्थ्यांच्या अंगी क्षमतांचा विकास व्हावा याद्दष्टीने पाठ्यक्रमांचा समावेश केलेला असतो. पाठ्यक्रमांतून ज्ञान, आकलन, उपयोजन, रसग्रहण, अभिरूची, अभिवृत्ती इ. विविध क्षमता विकसित करण्याचा प्रयत्न केला जातो. याचे मुल्यमापन करण्यासाठी परीक्षा पध्दतीचा वापर केला जातो.

परंतू आता विद्यार्थ्यांच्या उपयोजन आकलन,कौशल्याचे मूल्यमापन करण्यासाठी कृतिपत्रिका ही नवीन मूल्यमापन पध्दती शालेय स्तरावर वापरली जात आहे.

प्रस्तुत संशोधनात कृतिपत्रिकेचा ऊहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. याविषयी माहिती मिळविण्याचा केला आहे आणि अध्ययन क्षमतेच्या विकासात कृतिपत्रिकेची परिणामकारकता तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे.कृतिशीलतेला वाव देणाऱ्या या मूल्यमापन साधानाविषयी माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.

अध्ययन क्षमता विकसित करण्यासाठी कृतिपत्रिका विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरते का हे पाहण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनात केलेला आहे.

2. संशोधनाची गरज :-

प्रस्तुत संशोधन हे कृतिपत्रिका या नवीन संकल्पनेची माहिती होण्यासाठी गरजेचे आहे. या संशोधनामुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता जाणून घेता येतात. तसेच विद्यार्थ्यांचे कृतिपत्रिकेद्वारे कशाप्रकारे मूल्यमापन केले जाते तसेच विद्यार्थ्यांना क्रियाशील ठेवण्यासाठी कृतिपत्रिका उपयुक्त ठरतात का हे पाहता येते.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासात फक्त ज्ञानाचीच परीक्षा न घेता आकलन, उपयोजन, कौशल्य या पुढील पायऱ्यांचा देखील विकास करण्यावर भर देण्याच्या दृष्टीने कृतिपत्रिका कशाप्रकारे उपयुक्त आहेत, हे पाहता येते

या नवीन संकल्पनेचे आजच्या अभ्यासक्रमातील महत्त्व जाणून घेण्यासाठी हे संशोधन गरजेचे आहे.

3. संशोधनाचे महत्व :-

आजच्या काळात .विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास हा शिक्षणातून अभिप्रेत आहे. त्या दृष्टीने फक्त ज्ञानत्मक्र विकास अपेक्षित नसून आकलन ,उपयोजन कौशल्यया पातळीवरील देखील बोधात्मक्र पायऱ्या विद्यार्थ्यांने पूर्ण करणे महत्वाचे असते. त्या दृष्टीने विदयार्च्यांना आकलन उपयोजन, कौशल्य या पातळीवरील विकास करणे सोपे व्हावे तसेच तो किती प्रमाणात झाला आहे,यासाठी कृनिपत्रिका आहेत.

तर त्यांचा वापर कसा उपयुक्त् ठरतो हे पाहण्याच्या दृष्टीने हे संशोधन महत्वाचे आहे.

प्रस्तूत संशोधनामुळे आपणास कृत्रिपत्रिकेची माहिती होण्यास मदती होईल विद्यार्थ्यांना कृत्रिपत्रिकेद्वारे कशा प्रकारे रुचीपुर्ण आनंददायी , उत्साहवर्धकअध्ययन-अध्यापन प्रक्रिया, वाटुलागते हे जाणून होता येईल.

अशाप्रकारे हे संशोधन केवळ विदयार्थ्यांनाच नव्हे तर पालक, शिक्षक,मुख्याध्यापक सर्वांसाठीच महत्वाचे आहे.

4. समस्या विधान :-

इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता मूल्यमापनात कृतिपत्रिकेची उपयुक्तता – एक अभ्यास.

5. कार्यात्मक व्याख्या :-

अध्ययन क्षमता

अभ्यास करण्याची योग्यता

इयत्ता नववी

माध्यमिक स्तरावरील एक वर्ग

विद्यार्थी

शिकणारा

कृतिपत्रिका

कृतिद्वारे तयार केलेल्या प्रश्नांचा संच

6. **संशोधनाची उद्दिष्ट्ये :-**

1. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमतांचा शोध घेणे.

2. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या कृतिपत्रिकांचे विश्लेषण करणे.

3. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता मूल्यमापनातील कृतिपत्रिकेच्या उपयुक्ततेबाबत सद्यस्थितीचा शोध घेणे.

7. **संशोधनाची गृहितके :-**

1. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात अध्ययन क्षमतांचा समावेश केलेला आहे.

2. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनासाठी कृतिपत्रिका वापरल्या जातात.

8. संशोधनाची व्याप्ती :-

1. क्षेत्र व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची क्षेत्र व्याप्ती ही नांदेड शहरातील माध्यमिक शाळांपूरती व्याप्त आहे.

2. आशय व्याप्ती :

प्रस्तुत हे संशोधन अध्ययनक्षमता आणि कृतिपत्रिका इतके व्याप्त आहे.

3. कालावधी व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन हे सन 2019 पासून सुरु होऊन विद्यापीठाने ठरवून दिलेल्या कालावधीत पूर्ण केले जाणार आहे.

4. नमुना व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनात नांदेड शहरातील माध्यमिक शाळांची निवड ही नमुना निवड म्हणून करण्यात येईल.

9. संशोधन मर्यादा :

1. क्षेत्र मर्यादा :

प्रस्तुत संशोधन समस्येची क्षेत्र मर्यादा नांदेड शहरातील माध्यमिक शाळांपूरती मर्यादित आहे.

2. आशय मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे अध्ययनक्षमता आणि कृतिपकत्रिका इतकेच मर्यादित आहे.

3. काल मर्यादा :

विद्यापीठाने ठरवून दिलेल्या काल मर्यादेतच संशोधन पूर्ण करण्यात येईल.

4. नमुना मर्यादा :

प्रस्तुत संशोधनात नमुना निवड ही नांदेड शहरातील माध्यमिक शाळांपूरतीच मर्यादित आहे.

10. संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधन हे सर्वेक्षण या पध्दतीचा अवलंब करुन पूर्ण करण्यात येईल.

11. जनसंख्या – न्यादर्श :

नमुना निवड

सदरील संशोधनासाठी संशोधक यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करेल.

12. **माहिती संकलनाची साधने :-**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील साधनांचा वापर करण्यात येईल.

1. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नावली
2. शिक्षकांसाठी प्रश्नावली
3. मुख्याध्यापकांसाठी मुलाखत

13.**सांख्यिकीय परिमाणे :-**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील संख्याशास्त्रीय परिमाणांचा अवलंब करण्यात येईल.

1. शेकडेवारी
2. सहसंबध
3. काय-स्क्वेअर
4. टी- परिक्षिका

14. संशोधन कार्यवाहीचे टप्पे :-

समस्या निश्चिती
↓
संशोधन आराखडा लेखन
↓
आराखडा सादरीकरण
↓
आराखडा अंतिम मंजुरी
↓
पूर्व संशोधन व संशोधन संबंधित साहित्याचा आढावा
↓
संशोधन पध्दतीचा आढावा
↓
संशोधन साधन निर्मिती
↓
माहिती संकलन
↓
अर्थ विवेचन
↓
निष्क़र्ष व शिफारशी
↓
प्रत्यक्ष कार्यवाही
↓
संशोधन अहवाल लेखन
↓
अहवाल तपासणी व अंतिम मंजुरी
↓
अहवाल छपाई
↓
अहवालाचे संपादन
↓
अहवालास अंतिम रुप देणे
↓
अहवालाची बांधणी
↓
अहवाल सादरीकरण

15. वेळापत्रक :-

1	प्रस्तावना	ऑगस्ट 2019
2	संबंधित साहित्य व संशोधनाचा आढावा	ऑगस्ट ते जानेवारी 2020
3	संशोधन कार्यपध्दती	जानेवारी व ऑक्टोबर 2020
4	सांख्यिकीय विश्लेषण	ऑक्टोबर ते सप्टेंबर 2021
5	निष्कर्ष आणि शिफारशी	सप्टेंबर 2021 ते जून 2022

16. **अंदाजपत्रक :-**

1	स्टेशनरी खर्च	2000 रू. खर्च
2	माहिती संकलन	8,000 रू. खर्च
3	पुस्तकांचा खर्च	40,000 रू. खर्च
4	प्रवास खर्च	20,000 रू. खर्च
5	मुद्रण, प्रिटिंग व बांधणी खर्च	15,000 रू. खर्च
6	लॅपटॉप व इतर खर्च	90,000 रू. खर्च

18. **संदर्भ ग्रंथ सूची :-**

1. वि.रा.भिंताडे शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे नूतन प्रकाशन.
2. मुळे,उमाटे- शैक्षणिक तत्वज्ञानाची मुलतत्वे, औरंगाबाद, विद्या बुक्स.
3. कदम चा प.शैक्षणिक संख्याशास्त्र,पुणेनुतन.
4. जॉन डब्लू बेस्ट- शैक्षणिक संशोधन.
5. ए.ए. अन्सारी- अॅडव्हांस शैक्षणिक सांख्यिकी.
6. सुरेश करंदीकर- शै.मानसशास्त्र.
7. लीला पाटील-अध्यापन पध्दती.

मार्गदर्शक **संशोधक**

डॉ. गिरगावकर बालाजी जी. झांगडे अर्चना विठ्ठलराव

प्राचार्च,

सहयोगी सेवाभावी संस्था,

विष्णुपुरी, नांदेड.

(13)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड अंतर्गत

विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रवेशासाठी (R.R.C)

"संशोधन आराखड्याची फाईल"

संशोधकाचे नाव	:	झांगडे अर्चना विठ्ठलराव
मोबाईल नंबर	:	9588626822
ई-मेल आय. डी.	:	kamlakarauti69@gmail.com
कॅटेगिरी	:	open
फिजीकल हॅन्डीकॅप	:	Yes
मार्गदर्शकाचे नाव	:	डॉ. गिरगावकर बालाजी जी.
		M.Sc (Phy. Math.) M.Ed Phd.
विषयाचे नाव	:	शिक्षणशास्त्र(Education).

संशोधन विषयाचे शिर्षक

इयत्ता नववीतील विद्यार्थ्यांच्या अध्ययन क्षमता मूल्यमापनात कृतिपत्रिकेची उपयुक्तता – एक अभ्यास.